# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# प्रा. ए. व्ही. देशपांडे साहित्यिक-सांस्कृतिक चळवळ : डॉ. सागर देशपांडे

## पत्रकारितेतील माझी ५० वर्षे पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

मुक्तागिरी वृत्तसेवा

पाटण, दि. २७ : वाचन, लेखन, अभ्यास आणि संपादनाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या ए. व्ही. देशपांडे यांनी पाटणसारख्या तालुक्याच्या ठिकाणी राहून देखील तिथला पत्रकार संघ, ग्रंथालय संघ, साहित्य परिषद यासारख्या संस्थांमधून मोलाची भूमिका बजावली. ग्रंथपाल म्हणून पूर्णवेळ नोकरीची जबाबदारी सांभाळतानाही सर्व कार्यक्षेत्रात एक निःस्वार्थी कार्यकर्ता म्हणून नेहमीच समन्वयाची भूमिका पार पाडली. पाटण परिसरातल्या साहित्यिक- सांस्कृतिक



घडामोडींमध्ये त्यांनी तळमळीने सहयोग दिला. पुण्या-मुंबईपासून दूर असले तरी पाटणमध्ये विविध विधायक उपक्रम सुरू व्हावेत यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. या सगळ्याचा गेल्या ५० वर्षांचा धावता आढावा ''पत्रकारितेतील माझी ५० वर्षे'' या पुस्तकामधून त्यांनी घेतला आहे. पाटणचा स्थानिक इतिहास म्हणूनही या पुस्तकाचे स्थान आजच्या पिढीसमोर महत्त्वाचे असल्याचे मासिक जडण-घडणचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे यांनी पाटण येथे बोलताना सांगितले.

जेष्ठ पत्रकार व सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. ए. व्ही. देशपांडे यांनी लिहिलेल्या ''पत्रकारितेतील माझी ५० वर्षे'' या पुस्तक प्रकाशन समारंभावेळी ते बोलत होते. यावेळी कोयना शिक्षण संस्थेचे ज.से. अमरसिंह पाटणकर, जेष्ठ पत्रकार, लेखक प्रा. ए. व्ही. देशपांडे, बा.दे. कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. एच. व्ही. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जेष्ठ पत्रकार,लेखक प्रा.ए.व्ही. देशपांडे म्हणाले पत्रकारितेतील गेली ५० वर्षे काळाच्या ओघात मी काम करत गेलो.. लिखाण हा माझा छंद आहे.